महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# !!प्रकटन!!

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या **सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे** मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना **सुचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी)** परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळातील **विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket)** उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

**सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ** महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.१२वी)परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket)** ऑनलाईन **(Online)** पध्दतीने **मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर** सोमवार दिनांक १२/०१/२०२६ पासून **Admit Card** या **link द्वारे download करण्याकरिता उपलब्ध होतील.** या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक **शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.**

**ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून** घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी-मार्च २०२६ **साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील** सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे(Hall Ticket)प्रिंट** करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र **(Hall Ticket)** ऑनलाईन **(Online)** पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना **"Paid"** असे **Status** प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे **"Paid Status Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व **Extra Seat No.** विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे **"Extra Seat No Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. **Download** केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या **Online** पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता **Application Correction** ही **Link** उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर **"Correction Admit Card "** या **Link** व्दारे सुधारीत **Admit Card** उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६. ज्या आवेदनपत्रांना **"Paid "** असे **Status** प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे **Status Update** होवून **"Late Paid Status Admit Card"** या **Option** व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत **(Duplicate)** असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : ०९/०१/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- सातारा, सांगली, कोल्हापूर.

क्र. कोविमं/उ.मा./परीक्षा/ 178
दिनांक :- 14/०१/२०२६

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांबाबत उपरोक्त प्रकटनानुसार सर्व सूचनांची नोंद घेऊन कार्यवाही करावी. तसेच No Candidate करावयाच्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत न करता ती मंडळ कार्यालयात जमा करावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये विषय/माध्यम अथवा विषय कोड यामध्ये दुरुस्ती असल्यास सोबतच्या प्रपत्र नमुन्याप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव प्रवेशपत्राच्या तीन प्रतींसह प्रती दुरुस्ती रु. २००/- शुल्क रोखीने भरुन मंडळ कार्यालयात दि.०५/०२/२०२५ पूर्वी समक्ष सादर करावा, जणेकरुन दुरुस्ती प्रक्रिया वेळेत होईल. दुरुस्ती प्रस्ताव मंडळ कार्यालयास वेळेत प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत :- विहित नमुन्यातील दुरुस्ती नकाशा

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

**To be submitted before Examination**

प्रपत्र परीक्षेपूर्वी विहीत मुदतीत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क. महाविद्यालयाचा क्र.: | J | | | | | | | |

**HSC Examination of Feb - March / June - July ____________**

**Proforma indicating Errors in the Seat No. wise College List of Candidates**

| Sr. No. अ.क्र. | Application No. आवेदनपत्र क्र. | Seat No. बैठक क्र. | Name of Candidate विद्यार्थ्याचे नाव | Original/Incorrect Position in the College List/Hall Ticket क. महाविद्यालय यादीतील/ प्रवेशपत्रिकावरील नोंद | Correct Position as per the College Record क. महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.

स्थळ :-

दिनांक :-

प्राचार्य

____________________

____________________